# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-४४/२०२५ दिनांक- ३०/०१/२०२५

## प्रेस नोट

**" अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडून तुळींज पोलीस ठाणे हद्दीत एकुण ६२.३ ग्रॅम वजनाचा एम.डी ( मॅफेड्रॉन) हा अंमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्या परकीय नायजेरीन ईसमावर कारवाई "**

मिरा-भाईदर, वसई-विरार आयुक्तालयाचे अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, यांना दि.२८.०१.२०२५ रोजी नायगांव, वालीव, वसई, नालासोपारा, तुळींज परिसरात गस्त करुन अंमली पदार्थ खरेदी विक्री करणाऱ्या इसमांवर कारवाई करण्याचे आदेश मा.वरिष्ठांनी दिले होते.

त्या अनुषंगाने नायगाव, वालीव, वसई, परिसरात गस्त करुन नालासोपारा, तुळींज परिसरात गस्त करीत असताना सेंट्रल पार्क बाजुकडुन नालासोपारा पुर्व-पश्चिम उड्डाणपुल बाजुकडे जात असताना दिनांक २९.०१.२०२५ रोजी ००.३० वा. चे सुमारास साईबाजार येथील साई छाया बिल्डींग समोर रोडलगत एक दक्षिण आफ्रिका वंशाचा इसम दुचाकी गाडीवर बसुन कोणाची तरी वाट पाहत असल्याचे आम्हास दिसले. तसेच त्याची हालचाल संशयास्पद वाटत असल्याने त्याचेकडे कोणतातरी अंमली पदार्थ असल्याची शक्यता निर्माण झाल्याने त्यास ताब्यात घेण्यात आलेले आहे.

नमुद परकीय नायजेरीयन ईसम जॉनसर वॉकर, वय ४२ वर्षे, प्रगमी नगर, ९० फीट रोड, नालासोपारा(पुर्व), ता.वसई, जि.पालघर. मुळ रा. लागोस, देश- नायजेरीया याची दोन पंचांसमक्ष झडती घेतली असता त्याचे कब्जात ६२.३ ग्रॅम वजनाचा १२,००,०००/- रु. किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ व्यावसायीक प्रमाणात विक्री करीता बाळगला असताना मिळुन आला असुन सदर अंमली पदार्थ अंगझडती पंचनाम्याव्दारे जप्त करण्यात आला आहे. नमुद ईसमा विरुध्द एन.डी.पी.एस.ॲक्ट १९८५ चे कलम ८(क), २२(क)सह विदेशी नागरीक अधिनियम १९४६ चे कलम १४(अ) प्रमाणे तुळींज पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ।। ६१/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन नमुद गुन्हयाचा पुढील तपास तुळींज पोलीस ठाणे मार्फत चालु आहे.

सदरची कारवाई मा. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री. मदन बल्लाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पोलीस निरीक्षक, सचिन कांबळे, पोउनि.संतोष घाडगे, पोउनि.निखील चव्हाण, १.पोहवा/टक्के, २.पोहवा /पाटील, ३.पोहवा/कुडवे, ४.पोहवा/आव्हाड, ५.पोहवा/पागधरे, ६.पोहवा/यादव व पोशि/डोखळे यांनी केली आहे.

**------0000------**